ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ६ जून, १९५६ | अंक २३

## विविध माहिती

**पाकिस्तानांत तेलाचा शोध**—पाकिस्तानचें सरकार आणि दि शेल कंपनी ऑफ पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान तेलाचा शोध करण्यासंबंधीं एक करार करण्यांत आला आहे. करारांतील अटीप्रमाणें कंपनी पश्चिम पाकिस्तानांतील १०,००० चौरस मैल क्षेत्रफळांत खनिज तेलाचा शोध करणार आहे. व्यापारी दृष्टीनें फायद्याचें होईल इतकें तेल उपलब्ध होऊं लागल्यास कंपनी व पाकिस्तान नफा सारख्या प्रमाणांत वाटून घेतील.

**पायतणाच्या धंद्याला यंत्रसाह्य**—मद्रासजवळ पेरांबूर ह्या ठिकाणीं मद्रास सरकारनें बूट तयार करण्याचा कारखाना काढला आहे. कारखान्यांतील कामगार मूळचे चांभारच आहेत. कारखान्यांत बसविलेल्या यंत्रांच्या साह्यानें ते आतां उत्तम प्रतीचे बूट तयार करूं शकतात. जर्मनींतून मागविलेल्या यंत्रसामुग्रीनें कारखाना सज्ज करण्यांत आला आहे. यंत्रसामुग्रीची किंमत ८०,००० रुपये आहे.

**वीज-निर्मितीची योजना**—त्रावणकोर-कोचीन सरकारनें राज्यांतील नदीवर धरण बांधून वीज निर्माण करण्याची योजना मंजूर केली आहे. ह्या योजनेसाठीं २९५ लाख रुपये खर्च येईल. नदीला दोन ठिकाणीं बांध घालून दोन तळीं तयार करण्यांत येतील. १९६०-६१ सालीं धरणें बांधून पुरीं होतील आणि पाण्याच्या प्रवाहावर सुमारें १५,००० किलोवॅट वीज निर्माण होऊं लागेल.

**ल्हासांत उतरलेलें पहिलें विमान**—तिबेटची राजधानी ल्हासा येथें जाण्यासाठी चीनमधून मोटारीचा रस्ता तयार झालेला आहे. पण विमानें उतरण्याची सोय मात्र अद्याप नाहीं. तरी सुद्धां चीन सरकारचें एक विमान नुकतेंच तेथें उतरलें. विमानासाठीं तात्पुरती पट्टी तयार करण्यांत आली होती. ल्हासा समुद्रसपाटीपासून १४,००० फूट उंचीवर असल्यानें विमानांच्या वाहतुकीस अवघड आहे.

**रशिआ-युगोस्लाव्हिआ करार**—रशिआ आणि युगोस्लाव्हिआ ह्यांच्या दरम्यान अणुशक्तीबद्दल करार करण्यांत आला आहे. कराराच्या शर्तींस अनुसरून रशिआ १९५८ च्या आरंभीं युगोस्लाव्हिआंत प्रायोगिक अणुभट्टी बांधणार आहे. अणु विज्ञानाचा विकास व अणुशक्तीचा शांततामय कार्यासाठी उपयोग करण्याच्या धोरणाचाच हा एक भाग आहे.

**भारतामधील भूमि व लोकसंख्या**—भारताचा एकूण भूविस्तार ८१·१ कोटी एकर आहे. परंतु त्यांपैकी ३२·४ कोटी एकर इतकीच जमीन लागवडीला आणतां येण्यासारखी आहे. लोकसंख्या ३६ कोटींच्या जवळपास असल्यानें दरमाणशीं एका एकरपेक्षाहि कमी जमीन लागवडीसाठी मिळते, असा हिशोब होतो.

**अणुशक्तीनें चालणारें विमान**—रशिआच्या अणुशक्तीमंडळाचे डायरेक्टर मि. स्लाव्हस्की ह्यांनीं 'इझवेस्तिया' ह्या सरकारी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतींत असें सांगितलें कीं अणुशक्तीवर चालणारें विमानाचें एंजिन रशिआ लवकरच तयार करूं शकेल. उत्तर-ध्रुव प्रदेशांतील बर्फ कापून प्रवास करूं शकणारी एक बोट रशिआंत सध्या बांधण्यांत येत आहे. ह्या बोटीचें एंजिनहि अणुशक्तीवर चालणारें असेल.

**पाकिस्तानला रशिआचें धान्य**—पूर्व-पाकिस्तानांत अन्नधान्याचा तुटवडा पडल्यामुळें पाकिस्तानला बाहेरून धान्य मिळवावें लागतें आहे. भारतानें ५,००० टन तांदूळ पुरविण्याचें कबूल केलें आहे. त्याचप्रमाणें रशिआनेंहि २०,००० टन तांदूळ आणि २०,९००० टन गहूं देण्याचें ठरविलें आहे. रशिआंतील अन्नधान्य पाकिस्तानांत धाडण्याची व्यवस्था लवकरच करण्यांत येत आहे.

**रत्नागिरी जिल्ह्यांतील उन्हाळी**—मुंबई राज्यांतील गंधकमिश्रित उष्णकुंडांची पहाणी करून आरोग्यदायक स्थळें म्हणून त्यांचा विकास करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. हें काम करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली असून ती ठिकठिकाणच्या उष्णकुंडांना भेटी देत आहे. कमिटीनें रत्नागिरी जिल्ह्यांतील संगमेश्वर व राजापूर ह्या तालुक्यांतील बरींच उन्हाळीं नजरेखालीं घातलीं आहेत.

**ऑस्ट्रेलिआंत बुद्धमंदिर**—ऑस्ट्रेलिआंतील सिडने, मेलबोर्न, ब्रिसबेन आणि कॅनबेरा ह्या शहरांतून बुद्धाचे अनुयायी आहेत. ह्या साधकांची ध्यानाची सोय करण्यासाठी म्हणून सिडने शहराच्या एका उपनगरांत बुद्धमंदिर बांधण्याचें न्यू साऊथवेल्समधील बुद्ध सोसायटीनें ठरविलें आहे. मंदिरासाठी लागणारी जागाहि विकत घेण्यांत आली आहे.

**बोटीला लागणारीं डिझेल एंजिनें**—भारतांत बांधण्यांत येणाऱ्या बोटींना लागणारीं डिझेल तेलावर चालणारीं एंजिनें तयार करण्याचा कारखाना काढण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. हा कारखाना सरकारी मालकीचा राहील. ह्या बाबतींत बोटवहातूक करणाऱ्या कंपन्यांच्या गरजा अजमावण्यांत येत आहेत.

**महाबलिपुरम् येथें अतिथिगृह**—मद्रासजवळील महाबलिपुरम् ह्या यात्रास्थानीं एक अतिथिगृह बांधण्यांत येत आहे. गृहासाठी येणारा २ लाख रुपयांचा खर्च राज्य सरकार व मध्यवर्ती सरकार सारखाच करतील. अतिथिगृहांत सहा खोल्या बांधण्यांत येणार आहेत. काम सप्टेंबरपर्यंत पूर्ण होईल असा अंदाज आहे.

**मोटारींच्या कारखान्यांत मंदीचे वारे**—अमेरिकेंत मोटारींच्या कारखानदारांनीं उत्पादन कमी करण्याचें ठरविल्या-मुळें ५ लाख कामगारांना रोजगाराला मुकावें लागलें आहे. मजूर पुढाऱ्यांच्या अंदाजाप्रमाणें ही मंदीची छाया अधिक दाट होण्याचा संभव आहे. फोर्ड, क्रिसलर, स्टुडबेकर इत्यादि बडे कारखानेहि अडचणींत आहेत. आणखी १,५०,००० कामगारांना लवकरच घरीं बसावें लागेल असें दिसतें.

**तुपाचा सहकारी कारखाना**—त्रावणकोर-कोचीन राज्यांत तूप बनविण्याचा एक सहकारी कारखाना काढण्यांत येणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत राज्य सरकारनें सहकारी तत्त्वावर गौळवाडे स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ६·७५ लाख रुपये खर्च होणार आहेत. तुपाच्या कारखान्यांत पहिल्या वर्षीं १,५०० पौंड तूप तयार होईल. दुसऱ्या कार्य-क्रमाच्या अखेरच्या वर्षांत उत्पादन ९,००० पौंडापर्यंत वाढेल.

**आंतरराष्ट्रीय साखर परिषद्**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आंतरराष्ट्रीय साखर परिषदेचे एक उपाध्यक्ष म्हणून भारताचे श्री. गोपाल मेनन ह्यांची निवड करण्यांत आली आहे. परिषदेचें कामकाज दोन आठवडे चालणार आहे. १९५३ च्या आंतरराष्ट्रीय साखर कराराची अंमलबजावणी कशी काय झाली तें तपासून पहाण्याचें कार्य परिषद् करणार आहे. ह्या करारांत निर्यात व किंमती हे दोन प्रमुख मुद्दे आहेत.

**बंगलोरमधील रेशीम कारखाने**—बंगलोरमधील रेशमाच्या साड्या तयार करणारे कारखानें नुकतेंच पुन्हा चालू झाले आहेत. ज्या कारखान्यांतून रोज ३,००० पेक्षा अधिक साड्या तयार होत असत ते कारखाने बंद करण्याचा निर्णय कांहीं दिवसांपूर्वी कारखानदारांच्या संघानें घेतला होता. मजुरांच्या वाढत्या मागण्या आणि जबर कर हीं कारणें कारखाने बंद ठेवण्यासाठीं सांगितलीं गेलीं होतीं. पण नंतर मजूरसंघ व मालक ह्यांच्यांत तडजोड झाली.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

तारीख १६ मे १९५६ च्या भागीदारांच्या साधारण सभेंत

—भागीदारांनीं—

## —वसूल शेअर भांडवलाच्या तीन पट—

**ठेवींच्या भांडवलाच्या मर्यादेचा ठराव मंजूर केला**

१ वर्षाला ६ टक्के, ३ वर्षांला ७ टक्के, ५ वर्षांला ७॥ टक्के व्याज व व्याज सहा महिन्यांनीं असे ठेवींच्या भांडवलाचे नियम आहेत.

—यामुळें—

**शेअरपेक्षा ठेवी मध्यमवर्गाला सोयीच्या वाटतात**

— नवीन १००० टनाच्या मशिनरीनें —

**वार्षिक एक लक्ष पन्नास हजार पोतीं साखर होऊं शकते.**

साखर-विक्रीनंतर उसाकरितां खर्च झालेली रक्कम रोख हातांत येते. इन्कमटॅक्स, इतर सरकारी देणीं, नोकर-वर्गाचा पगार, साखर करण्याचा खर्च वजा जातां

**★ दर पोत्यास ५ रुपये खात्रीचा नफा रहातो ★**

शेअर भांडवल २८,१६,६७४ रुपये असल्यामुळें

**★ शेअरवर २० टक्के डिव्हिडंड ★**

**WAIT AND SEE**

कॉमनवेल्थ बिल्डिंग ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ, पुणें २.
दि. २१ मे १९५६

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंटस्.

# अर्थ

बुधवार, ता. ६ जून, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकेचा सब–एजंट हा अधिकारी, कीं कामगार ?

### नांवांत जादू नाहीं; कामाचें स्वरूप महत्त्वाचें.

गोपाळ कपूर हा हिंदुस्थान कमर्शिअल बँक लि. च्या कानपूर येथील मुख्य कचेरींत 'सब–एजंट' ह्या नांवानें काम करीत होता. ४ नोव्हेंबर, १९४९ रोजीं त्याला कामावरून काढून टाकण्यांत आलें. आपल्याला पुनः कामावर घ्यावें, ही त्याची मागणी सेंट्रल गव्हर्मेंट इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलचे चेअरमन श्री. कँबेल पुरी ह्यांनीं फेटाळून लावली. कपूर हा सब–एजंट म्हणजे अधिकारी होता; कामगार नव्हता, असें ट्रायब्यूनलनें निवाड्यांत म्हटलें होतें. कपूरनें अपील केलें तेव्हां लेबर अपेलेट ट्रायब्यूनलनें खालचा निवाडा फिरवला. "केवळ नांवामध्यें कोणतीहि मोहिनी नाहीं; व्यक्ति काम काय करते व तिच्यावर जबाबदाऱ्या कोणत्या आहेत, ही गोष्ट महत्त्वाची आहे" असें नमूद करून अपील कोर्टानें मूळ ट्रायब्यूनलकडे प्रकरण धाडलें आणि कपूर हा अधिकारी होता कीं कामगार होता हें वस्तुस्थिति पडताळून पुनः निवाडा करण्यांत यावा, असा हुकूम केला. ह्या हुकुमाप्रमाणें, श्री. कँबल पुरी ह्यांनीं पुनः चौकशी करून, पुनः त्याला अधिकारीच ठरविलें. कपूरनें पुनः अपील केलें, तेव्हां लेबर अपेलेट ट्रायब्यूनलनें तो अधिकारी होता, असा निवाडा केला. "नोकर हा कामगाराचे व्याख्येंत बसेल अशा प्रकारचें कारकुनी काम करतो काय ?" हा प्रश्न महत्त्वाचा आहे. "कोणत्याहि उद्योगधंद्यांत पैशासाठीं तज्ज्ञ व अतज्ज्ञ शारीरिक किंवा कारकुनी काम करणारा, तो कामगार," अशी कायद्याची व्याख्या आहे. तेव्हां, नोकर हा अधिकारी आहे काय, ह्या दृष्टीनें विचार न करतां, तो जीं कामें करतो ती बहुंशीं कारकुनी स्वरूपाचीं आहेत काय, ह्या दृष्टीनें छाननी केली पाहिजे. प्रत्येक बाबींतील निर्णय त्या त्या बाबीविषयक वस्तुस्थितीवरच अवलंबून राहील. कपूरला सब–एजंट म्हणून संबोधलें व शाखेच्या एजंटाइतकाच त्याला पगार व भत्ता मिळत होता, ह्या गोष्टींना महत्त्व नाहीं. तो करीत असलेलें काम मुख्यतः कारकुनी स्वरूपाचें होतें, असें ट्रायब्यूनला आढळलें. त्याला काढून टाकण्याचा बँकेला अधिकार नव्हता म्हणून त्याला पुनः नेमण्यांत यावें, असा ट्रायब्यूनलनें हुकूम केला.

कामगार ह्या शब्दाची व्याप्ति वाढविण्याकडे कल सध्यां दिसून येतो. कांहीं वर्षांपूर्वी, एका कन्सिलिएशन अवार्डमध्यें न्यायमूर्ति वृंदवासिनी प्रसाद ह्यांनीं खालीलप्रमाणें स्पष्ट म्हटलें होतें:– "उपशाखा, हें जवळजवळ स्वतंत्र यूनिटच असतें; सब–एजंट किंवा सब–मॅनेजर हा तिचा प्रमुख असतो. त्याला कामगार म्हणून मानण्यांत आलें, तर उपशाखेला अधिकारी उरणारच नाहीं, आणि उपशाखेला अधिकारी नसणें, ही कल्पनाच मला पसंत नाहीं. सब–एजंट किंवा सब–मॅनेजर हा अधिकारीच आहे; कामगारांच्या व्याख्येंत तो येत नाहीं."

न्यायमूर्ति वृंदवासिनी प्रसाद ह्यांच्या वरील उद्गारांत पुढें श्लेष काढण्यांत येऊं लागले. "प्रत्येकच सब–एजंट किंवा सब–मॅनेजर हा अधिकारी असेलच, असें नाहीं. एखाद्या शाखेला फारसें कामच नसेल; तेथील सब–एजंटला देखरेखीचें काम पडणार नाहीं. सब–एजंट हा अधिकारी आहे, हें गृहीत धरून त्याला आवश्यक ते अधिकार व जबाबदाऱ्या देण्याचा उद्देश होता कीं नाहीं व त्याला दिलेला दर्जा केवळ दिखाऊ होता कीं काय, हें तपासून पाहिलें पाहिजे."

एखाद्या दूर ठिकाणच्या बँक–शाखेस न्या. प्रसाद ह्यांचे उद्गार लागूं पडतील, पण मुख्य कचेरींत किंवा मोठ्या शहरांतील कचेऱ्यांत एजंट किंवा सब–एजंट ह्याचेकडे सूत्रें असणारहि नाहींत, असा युक्तिवाद लढविण्यां येऊं लागला. इंडस्ट्रिअल डिस्प्यूटस ॲक्टचा चालू काळाचीं पावलें लक्षांत घेऊनच अर्थ लावला पाहिजे; कोणत्याहि नोकराचें त्यामुळें आर्थिक नुकसान झालें तर तें भरून मिळावें, हा त्या कायद्याचा हेतु आहे, हें गृहीतच धरून चाललें पाहिजे. कामगाराच्या व्याख्येची त्यामुळें व्याप्ति वाढत चालली आहे.

### भारत ब्रह्मदेश व्यापारी करार

भारत आणि ब्रह्मदेश ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार घडवून आणण्यासाठीं वाटाघाटी करण्यांत येणार आहेत. तथापि, हा व्यापारी करार होण्यापूर्वीच भारतानें ब्रह्मदेशाकडून पुढील पांच वर्षांत जास्तींत जास्त २० लाख टन तांदूळ आयात करण्याचें कबूल केलें आहे. पहिल्या तीन वर्षांत आयात करावयाच्या तांदुळाची किंमत ठरविण्यांत आलेली आहे. पण त्यापुढील दोन वर्षांत आयात करावयाच्या तांदुळाची किंमत नंतर ठरविण्यांत येणार आहे. जास्तींत जास्त किती तांदूळ आयात करावयाचा हें ठरविण्यांत आलें असलें तरी ब्रह्मदेशांतील तांदुळाच्या पुरवठ्याच्या परिस्थितीप्रमाणें आयातींत कमीअधिक करण्याची सवड ठेवण्यांत आली आहे. भारत आणि ब्रह्मदेश ह्यांच्या प्रतिनिधींच्या दरम्यान अधिक व्यापक व्यापारी करार करण्याच्या दृष्टीनें प्राथमिक वाटाघाटी ह्यापूर्वीच झालेल्या आहेत. कराराची ठोकळ रूपरेषा आंखण्यांत येऊन त्यासंबंधीं उभयतां प्रतिनिधी–मंडळांत चर्चाहि झालेली आहे. ह्या चर्चेवरून असें दिसून आलें कीं, ब्रह्मदेशाचें सरकार भारताकडून कापड, कोळसा, तागाच्या वस्तू आणि वनस्पतींचीं तेलें हा माल पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणांत आयात करण्यास उत्सुक आहे. पण करारांचें स्वरूप ह्याहीपेक्षा अधिक व्यापक होण्याचा संभव आहे. भारताकडून ब्रह्मदेश कांहीं भांडवली मालहि विकत घेण्यास तयार आहे. भारतांत तयार झालेलीं यांत्रिक हत्यारें आणि विजेची भारी यंत्रसामुग्री ब्रह्मदेशाला पाहिजे आहे. अशा प्रकारचा व्यापक करार उभयतां देशांना सोयीस्कर आहे. कारण, त्यामुळें ब्रह्मदेशाच्या तांदळाला दीर्घकालीन व निश्चित बाजारपेठ लाभेल. उलटपक्षीं, भारतामधील कापडाला व इतर मालाला ब्रह्मदेशाची बाजारपेठ लाभेल. ब्रह्मदेशाच्या बाजारपेठेंत जपानसारखे कांहीं देश कापड पाठवूं लागलेले आहेत. ह्या देशांच्या मालाशीं स्पर्धा करण्याची संधीहि भारताला मिळेल.

## १९५५ मधील बँकिंगची प्रगति

### ( रिझर्व्ह बँकेचा आढावा )

१९४९ चा बँकिंग कंपन्यांचा कायदा ( कलम ३६ ( २ ) प्रमाणें रिझर्व्ह बँक प्रसिद्ध करीत असलेला १९५५ बाबत अहवाल प्रसिद्ध झाला आहे. ह्या वर्षांत बँकिंगच्या व्यवसायाची वाढ झाली, त्याचप्रमाणें बँकिंगच्या क्षेत्रांत घटनात्मक महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणल्या गेल्या. देशांतील समाधानकारक आर्थिक परिस्थितीचें प्रतिबिंब बँकिंगच्या धंद्यांत दिसून आलें. बँकांकडील ठेवींत १९५४ प्रमाणेंच वाढ झाली, परंतु त्यांनीं दिलेल्या कर्जांत त्या मानानें ज्यास्तच वाढ झाली. ह्याचा अर्थ, ठेवी आणि दिलेलीं कर्जें ह्यांतील फूस कमी होऊन रिझर्व्ह बँकेच्या मदतीचा अधिक अवलंब करून व रोकड कमी करून व्यवहार करण्यांत आले. ठेवींतील सर्वच्या सर्व वाढ कर्जांत गुंतली जाऊन त्यामुळें ठेवींवरील व्याजाचे दरहि वाढले. आतांपर्यंत हिंदी बँकाच फक्त रिझर्व्ह बँकेकडून बिल मार्केट योजनेखालीं कर्जें घेत असत; आतां एक्सचेंज बँकाहि घेऊं लागल्या आहेत.

युद्धोत्तर काळांत प्रथमच बँकांच्या कचेऱ्यांच्या संख्येंत वाढ घडून आली. शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ९१ ची भर पडून त्यांची संख्या ३,७९३ झाली. एक्सचेंज बँका ६५ च्या ६६ झाल्या. बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या २८ नें कमी होऊन १२५८ राहिल्या. स्टेट बँकेनें नव्या शाखा उघडण्याचें धोरण त्वरेनें प्रत्यक्षांत आणलें आहे; पहिल्याच सहा महिन्यांत तिनें २० शाखा उघडल्या.

१८ मोठ्या शेड्यूल्ड बँकांचें मिळून उत्पन्न ३·८ कोटी रुपयांनीं वाढून तें ३५·० कोटी रुपये झालें. खर्चांतहि ३·४ कोटी रुपयांची वाढ झाली. म्हणजे, निव्वळ नफा ०·४ कोटी रुपयांनीं वाढून तो ५·७ कोटी रुपये झाला.

रिझर्व्ह बँकेनें १९५५ मध्यें १२ बँकांना लायसेन्स दिलें. म्हणजे, एकूण ४६ बँका लायसेन्सधारी झाल्या. स्टेट बँक व आणखी तीन निमसरकारी बँका ह्यांना लायसेन्स कायद्यानें आवश्यक केलेला नाहीं. अशा रीतीनें हा ५० बँकांकडे ९८१ कोटी रुपयांच्या ( म्हणजे, सर्व बँकांकडील एकूण ठेवींच्या ९०·८% ) ठेवी होत्या. १४ बिगर-शेड्यूल्ड बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आला; अशा बँकांची संख्या आतां ३० झाली. ४२२ बँकांचे अर्ज अद्याप निकालांत काढलेले नाहींत. १९५५ मध्यें १५ बँका ( सर्व बिगर-शेड्यूल्ड ) लिक्विडेशनमध्यें गेल्या.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमुळें बँकांच्या व्यवहारांत तर वाढ होईलच; पण त्याबरोबर त्यांच्या पद्धतींतहि बदल घडून येईल. व्यापार व उद्योगधंदे ह्यांना खेळतें भांडवल अधिक मोठ्या प्रमाणावर पुरवावें लागेल. सध्या मोठ्या शहरांतून बँकांच्या कचेऱ्या एकवटलेल्या आहेत; अंतर्गत विभागांत बँकिंगच्या सोई पुरेशा नाहींत. ही परिस्थिति लक्षांत घेऊन, स्टेट बँकेच्या शाखा-वाढीचा कार्यक्रम आखण्यांत येत आहे, आणि पैशाच्या वर्गावर्गाच्या सोईंत सुधारणा करण्यांत येत आहे. रूरल क्रेडिट सर्व्हेच्या शिफारशी अंमलांत येऊं लागल्यानें बँकिंगचा व्याप वाढत चालला आहे. त्यामुळें, प्रत्यक्ष कारभार चांगला व्हावा, ह्या गोष्टीस विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे.

**संपामुळें २ कोटींचें नुकसान**—भारतीय रेल्वेवर गेल्या महिन्यांत ठिकठिकाणीं संप करण्यांत आले. ह्या संपाच्या वावटळीमुळें रेल्वेचें २ कोटी रुपयांचें नुकसान झालें असा अंदाज करण्यांत आला आहे. संपामुळें रेल्वेच्या उत्पन्नांत झालेली घट आणि कामगारांनीं मालमत्तेची केलेली नासधूस ह्या दोन बाबींसंबंधींचा हा अंदाज आहे.

**मुलांसाठीं वस्तुसंग्रहालय**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत भारतामधील वस्तुसंग्रहालयांचा विस्तार व पुनर्घटना करण्याचें कार्य करण्यांत येणार आहे. ह्या मोहिमेंतील एक भाग म्हणून दिल्ली येथें लहान मुलांच्यासाठी एक राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय स्थापन करण्यांत येईल. वस्तुसंग्रहालयाच्या विकासासाठी ५ वर्षांत २·५ कोटी रुपये खर्च होतील.

**रूपकुंडासंबंधींचें रहस्य**—उत्तर प्रदेशांतील गढवाल जिल्ह्यांत रूपकुंड ह्या ठिकाणीं माणसांचे शेंकडो सांगाडे आणि अलंकार कांहीं महिन्यांपूर्वी आढळून आले. हे अवशेष त्या ठिकाणीं १०० वर्षांपेक्षाहि अधिक काळ आहेत, असें म्हणतात. ह्या रहस्यमय प्रकाराची चवकशी करण्यासाठीं शास्त्रज्ञांची एक तुकडी रवाना झाली आहे. रूपकुंड सरोवर समुद्रसपाटीपासून १८,००० फूट उंचीवर आहे.

**अफगाणिस्थानला कर्ज पाहिजे**—अफगाणिस्थानचें सरकार जागतिक बँकेकडून डॉलर्स चलनांतील कर्ज मिळविण्याची खटपट करीत आहे. अफगाणिस्थानच्या आर्थिक व द्रव्यविषयक परिस्थितीची पहाणी करण्यासाठीं इंटरनॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट ह्या संस्थेचें एक तज्ज्ञ-मंडळ लवकरच काबूलला जाणार आहे. कर्जाचा विचार मंडळाच्या अहवालाच्या स्वरूपावर अवलंबून राहील.

**रशिआकडून सोनें घेणार**—रशिआकडून सोनें आयात करण्याचा विचार भारतीय सरकार करीत आहे, असें समजतें. रशिआंतून सोनें व रत्नें निर्यात करणारी सरकारी मालकीची कंपनी आहे. ह्या सोन्याच्या आयातीमुळें भारतामधील चलनवृद्धीला आळा घालण्यास मदत होईल असें म्हणतात. रशिआजवळील सोन्याचा सांठा जगांत दुसऱ्या क्रमांकाचा आहे. गेल्या महिन्यांत रशिआनें १२,७५,००० औंस सोनें पश्चिम युरोपांतील राष्ट्रांत निर्यात केलें.

**स्टेट वेअरहौस कॉर्पोरेशन**—मध्यप्रदेश सरकारनें स्टेट वेअरहौस कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या कॉर्पोरेशनच्या मालकीच्या गुदामांत धान्य ठेवून त्याच्या तारणावर शेतकऱ्यांना कर्जें देण्याची व्यवस्था करण्यांत येईल. कॉर्पोरेशनचें काम पहाण्यासाठी ११ जणांचें बोर्ड नेमण्यांत येणार आहे. कमी उत्पन्नाच्या गटांतील लोकांची घराची सोय करण्यासाठीं राज्य सरकारला मध्यवर्ती सरकारकडून ५० लाख रुपयांचा दुसरा हप्ता मिळाला आहे.

तमाम दंतरोगांवर
☆ नागछाप म्हणजे काळी दूध पावडर

## मुंबई राज्यांतील सहकारी सोसायट्यांची वर्गवारी
(३०-६-१९५५)

| सोसायटीचा प्रकार | | संख्या |
|---|---|---|
| १. बॉंबे स्टेट को. इन्स्टिटयूट | | १ |
| २. बॉंबे स्टेट को. बॅंक | | १ |
| ३. बॉंबे प्रॉ. लॅ. मॉर्गेज बॅंक | | १ |
| ४. बॉंबे स्टेट को. हाउसिंग फायनान्स सोसायटी | | १ |
| ५. बॉंबे स्टेट को. मार्केटिंग सोसायटी | | १ |
| ६. बॉंबे स्टेट को. इं. असोसिएशन | | १ |
| ७. सेंट्रल को. बॅंका | | २० |
| ८. बॅंकिंग युनियन्स | | ५ |
| ९. इतर फायनान्सिंग संस्था | | ३ |
| १०. इंडस्ट्रिअल को. बॅंका | | ५ |
| ११. ॲ. के. व थ्रिफ्ट सोसायट्या | | ५,४९३ |
| १२. मल्टिपर्पज सोसायट्या | | ५,६३२ |
| १३. धान्य बॅंका व सोसायट्या | | ४०५ |
| १४. प्राथमिक लॅंड मॉर्गेज बॅंका | | १८ |
| १५. जिल्हा व तालुका खरेदी-विक्री संस्था | | ३४४ |
| १६. डेअरी व दूध सोसायट्या | | १३६ |
| १७. इंप्लिमेंट, सीड, खतें-पुरवठा संस्था | | ३३ |
| १८. ता. डे. बोर्डे | | २४७ |
| १९. ॲ. प्रोसेसिंग सोसायट्या | साखर | ८ |
| | जिनिंग | १४ |
| २०. बेटर फार्मिंग सोसायट्या | | ८३ |
| २१. टेनंट फार्मिंग सोसायट्या | | ९७ |
| २२. जॉइंट व कलेक्टिव्ह फार्मिंग सोसायट्या | | १९० |
| २३. इरिगेशन सोसायट्या | | २४७ |
| २४. सुपरवायझिंग यूनियन्स व फेडरेशन्स | | २३२ |
| २५. जिल्हा व डि. को. बोर्डें | | ३० |
| २६. अर्बन को. बॅंका | | २०५ |
| २७. अर्बन क्रे. सोसायट्या व भिशी | | १,४३३ |
| २८. फिशरीज सोसायट्या | | ८० |
| २९. कंझ्युमर्स सोसायट्या व स्टोर्स | | ९४१ |
| ३०. हाउसिंग सोसायट्या | | १,०६० |
| ३१. डि. इंडस्ट्रिअल असोसिएशन्स | | १८ |
| ३२. वीव्हर्स को. सोसायट्या | | ४९२ |
| ३३. इं. प्रोड्यूसर्स सोसायट्या | | ७४७ |
| ३४. लेबर व लेबर कॉन्ट्रॅक्ट सोसायट्या | | २३९ |
| ३५. इन्शुअरन्स सोसायट्या | | ११ |
| ३६. इतर | | ३७३ |
| एकूण | | १८,८४७ |

### त्रावणकोर सनातन बॅंक लि.

वरील बॅंकेस रिझर्व्ह बॅंकेनें लायसेन्स देण्यास नकार दिला आहे.

### स्टेट बॅंकेंत तीन बॅंकांचें विलीनीकरण

हैद्राबाद स्टेट बॅंक, दि स्टेट बॅंक ऑफ सौराष्ट्र आणि दि त्रावणकोर बॅंक ह्यांचें स्टेट बॅंक ऑफ इंडियांत विलिनीकरण होण्याचें ठरलें आहे, असें समजतें. बॅंक ऑफ बरोडाला तूर्त हात लावण्यांत येणार नाहीं. इतर सहा संस्थांनी बॅंकांच्या विलिनीकरणाचा प्रश्न पुढें ढकलण्यांत आला आहे. पार्लमेंटच्या येत्या बैठकींत आवश्यक तें बिल मांडलें जाईल.

## मुंबई राज्यांतील सहकारी सोसायट्या

| | ३०-६-१९५५ | ३०-६-१९५४ |
|---|---|---|
| सोसायट्यांची संख्या | १८,८४७ | १८,०७९ |
| सभासद संख्या | २९·६७ लक्ष | २८·०७ लक्ष |
| वसूल भांडवल | २२·१० कोटी रु. | १९·८१ कोटी रु. |
| खेळतें भांडवल | १२१·३३ कोटी रु. | १०९·२५ कोटी रु. |
| प्रत्येक सभासदास दिलेलें कर्ज (सरासरी) | १०६·६ रु. | १०८·१ रु. |
| प्रत्येक सभासदाकडून येणें कर्ज (सरासरी) | १४२·१ रु. | १३३·४ रु. |

जून, १९५५ अखेर २,०९६ सोसायट्या लिक्विडेशनमध्यें होत्या. त्यांपैकीं शेतकी क्रेडिट सोसायट्यांची संख्या १,२६६ होती.

### कै. दिवाणबहादुर गांधी

जुन्या पिढींतील सुप्रसिद्ध कार्यकर्ते, दिवाणबहादुर चुनीलाल माणेकलाल गांधी हे १४ मे, १९५६ रोजीं वयाच्या ८५ व्या वर्षीं मृत्यु पावले. दि. ब. गांधी हे सुरत जिल्हा को. बॅंकेचे एक उत्पादक होते व त्या बॅंकेचे ते १९०९ ते १९५० अखेर डायरेक्टर आणि १९१७ ते १९५० अखेर चेअरमन होते. १९५० या वर्षीं त्यांची बॅंकेच्या अध्यक्षपदीं निवडणूक झाली; ती जागा त्यांनीं मृत्यूपर्यंत भूषविली. मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटचे ते १९३५ ते १९३९ व्हाइस चेअरमन होते. गुजरात को. स्कूलचे ऑनररी प्रिन्सिपाल, बॉंबे स्टेट को. बॅंकेचे डायरेक्टर, बॉंबे को. इन्शुअरन्स सोसायटीचे उत्पादक व चेअरमन, ह्या नात्यांची त्यांची कामगिरीहि सुप्रसिद्ध आहे. सुरतमधील शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनाशीं त्यांचा निकटचा संबंध होता, व तेथील सर्व प्रमुख संस्थांना ते मार्गदर्शन करीत असत.

### दि फलटण बॅंक लि.

वरील बॅंकेस १९५५ सालीं ६ रु. ७ आ. नफा झाला. त्यापैकीं १ रु. ६ आ. ६ पै रिझर्व्ह फंडांत टाकून ५ रु. ० आ. ६ पै इनकमटॅक्स तरतूद व संशयित व बुडित फंड खातीं घालण्यांत येतील. बॅंकेचें वसूल भांडवल ५५,५१० रु. असून रिझर्व्ह फंड २६,५९४ रुपयांचा आहे. ठेवी ९९,४७५ रुपयांच्या आहेत. बॅंकेनें एकूण ७७,८९४ रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. निव्वळ नफा हा कांहीं अन्य कारणांमुळें कमी दिसत असला, तरी अहवालाचे वर्षीं बॅंकेच्या उत्पन्नाचें प्रमाण जवळ जवळ गतवर्षीइतकेंच आहे व एकूण व्यवहारांतील भांडवलांत गतवर्षीपेक्षा वाढ झाल्याचें दिसून येईल. बॅंकेची वार्षिक सभा १४ जुलै रोजीं आहे.

### पंजाब नॅशनल बॅंक : भांडवलांत वाढ व बोनस भाग

पंजाब नॅशनल बॅंक लि. चें अधिकृत भांडवल १ कोटि रु. असून तें प्रत्येकी २५ रुपयांच्या ४,००,००० भागांत विभागलेलें आहे. आतां, हें अधिकृत भांडवल २ कोटी रुपये करण्याचा विचार आहे. हें भांडवल प्रत्येकी २५ रुपयांच्या ८,००,००० भागांत विभागलें जाईल. शेअर प्रीमिअम खात्यांत ३७,५०,००० रु. आहेत, त्यांचें भांडवलांत रूपांतर करून, प्रत्येकी २५ रुपयांचे १,५०,००० बोनस भाग काढण्यांत येतील. प्रत्येक ७ भागांना ३ बोनस भाग ह्या प्रमाणांत हे भाग दिले जातील. कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजची परवानगी मागण्यांत येत आहे.

### रेल्वेवरील संपाचा उत्पादनावर परिणाम

गेल्या महिन्याच्या आरंभीं साऊथ ईस्टर्न रेल्वेवर झालेल्या संपामुळें रेल्वेचें व इतर धंद्यांचें बरेंच नुकसान झालें असून अजूनहि कांहीं काळ त्याचे परिणाम जाणवणार आहेत. पोलादाच्या व इतर कारखान्यांना लागणारा कच्चा माल संपामुळें पुरवितां आला नाहीं. धामधुमीच्या वातावरणामुळें ५२५ मालगाड्या सोडतां आल्या नाहींत. त्याशिवाय ३६३ मालगाड्या निरनिराळ्या ठिकाणीं अडकवून ठेवाव्या लागल्या. बिहार, मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल आणि ओरिसा ह्या राज्यांतील ९३८ मैल लांबीच्या रेल्वेरस्त्यावरील वहातुकींत संपामुळें विस्कळीतपणा आला. त्याचप्रमाणें १५४ स्टेशन्सवरील कामांतहि व्यत्यय आला. उतारूंची नेआण करणाऱ्या गाड्यांवरहि असाच परिणाम झाला. ५२ गाड्या रद्द कराव्या लागल्या. ९ गाड्या मुक्कामाला पोंचण्यापूर्वीच थांबवून ठेवाव्या लागल्या. ६ गाड्यांना आपला नेहमींचा मार्ग सोडून लांबच्या मार्गानें प्रवास करावा लागला आणि ४८ गाड्यांना कित्येक तास थांबून थांबून प्रवास करावा लागला. एका मेलगाडीला तर एका स्टेशनांत ९ तास अडकून पडावें लागलें. खरगपूर येथील संप सोडून १५,००० माणसांचे कामाचे तास वाया गेले. बंगाल व बिहारमधील कोळशांच्या खाणींपासून दररोज सरासरी ९०० कोळशाच्या वाघिणी भरून जात असतात. संपाच्या कालावधींत दररोज सरासरी ६२० वाघिणीच भरल्या गेल्या. दोन दिवस तर एकहि वाघीण भरली गेली नाहीं. टाटा आयर्न आणि स्टील कंपनीला रोज १४ मालगाड्या माल लागतो. पण मे च्या ४ व ५ तारखेस रेल्वेकडून अवघ्या तीनच गाड्या माल पाठविण्यांत आला. संप मागें घेण्यांत आल्यावर हळूहळू पुरवठ्यांत सुधारणा होऊं लागली. पोलादाच्या कारखान्यांप्रमाणेंच इतर उद्योगधंद्यांनाहि कच्च्या मालाच्या अपुऱ्या पुरवठ्याला तोंड द्यावें लागलें.

---

### स्वयंचलित यंत्रसामुग्रीमुळें बेकारी

गेल्या दहा वर्षांत अमेरिकेंतील मोठमोठ्या कारखान्यांत स्वयंचलित यंत्रसामुग्री बसविण्याच्या बाबतींत झपाट्यानें प्रगति होत आहे. बहुतेक सर्व मोठ्या उद्योगधंद्यांनीं अशा प्रकारचीं गुंतागुंतीचीं यंत्रें बसवून आपल्या उत्पादनाच्या खर्चांत बचत केली आहे आणि त्याचबरोबर उत्पादनहि वाढविलें आहे. ज्या कारखान्यांनीं ह्या दिशेनें पावलें टाकलीं नाहींत त्यांना आपला धंदा बंदच करावा लागला. ही बाब केवळ नवीन प्रकारची यंत्रसामुग्री बसविण्याची नाहीं. नवीन प्रकारच्या यंत्रांतहि माणसाची मदत घ्यावीच लागते. स्वयंचलित यंत्रसामुग्री ही उत्पादनाची अजिबात नवीन अशी पद्धत आहे. कांहीं मध्यम प्रतीच्या धंद्यांत ही उत्पादनपद्धति अंमलांत आल्यावर माणसाची गरज मुळांतच नाहींशी होते. कच्च्या मालाच्या संस्करणापासून पक्का माल बाहेर पडण्यापर्यंतच्या सर्वच क्रिया माणसाचा हातहि न लागतां करण्यांत येतात. अवजड धंद्यांतून मात्र १०० टक्के स्वयंचलित उत्पादनपद्धति उपयोगांत आणतां येत नाहीं असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. अमेरिकेंतील प्लायमथ ह्या मोटारीच्या कारखान्यानें मोटारींच्या उत्पादनांतील २५ टक्के कामें पूर्णपणें स्वयंचलित पद्धतीनें करण्यास प्रारंभ केला आहे. पण ह्या यांत्रिक क्रांतीमुळें अमेरिकेंतील मजुरांत चिंतेचें वातावरण पसरलें आहे. एका कामगार संघटनेचा नेता ह्याविषयीं बोलतांना म्हणाला कीं, डेट्राइट शहरांतील मोटारींच्या कारखान्यांचें उत्पादन गेल्या दोन वर्षांत खूपच वाढलें आहे. पण त्याचबरोबर बेकारांची संख्याहि १,७०,००० वर आली आहे. कमी कामगार कामावर असूनहि उत्पादन वाढत आहे. नवीन उत्पादनपद्धतीमुळें नव्या नोकऱ्या उपलब्ध होणें शक्य असलें तरी बिगर-वाकबगार कामगारांचे संधिकालांत फार हाल होतात. त्यांना शिक्षण देऊन वाकबगार करण्याची व्यवस्था कारखान्याच्या चालकांनीं व सरकारनें केली पाहिजे.

---

### दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड

वरील कंपनीस ३०-९-१९५५ च्या अखेरच्या वर्षी ७,८९,९७५ रु. निव्वळ नफा झाला. ऑर्डिनरी भागांवर १०% डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीला साखर विक्रीचें ८९,०८,०४४ रु. मिळाले व शिल्लक साखर २१,८५,०५१ रु.ची आहे. तारण न दिलेल्या ठेवींची रक्कम ४३,३२९८६ रु. आहे. साखर सांठा व नवी साखर ह्यांच्या विक्रींतून बँकेचीं ३८,९३,५०८ रु. चीं तारणावरील कर्जें व्याजासह परत केलीं, असें अहवालांत नमूद आहे.

---

### धूम्रपानाविरुद्ध मोहीम

स्वीडनमधील शेंकडा ९ शाळकरी मुलें धूम्रपान करतात, असें आढळून आलें आहे. त्याला आळा घालण्यासाठी, स्वीडनमध्यें सिगारेट, सिगार व तंबाखू ह्यांच्या सर्व जाहिरातींना बंदी करण्यांत आली आहे.

---


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर.

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची सहामाही चर्चात्मक सभा रविवार दिनांक २४-६-१९५६ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां बँकेच्या मुख्य कचेरींत भरणार आहे.

तरी सर्व सभासदांनीं सभेस हजर रहावें अशी विनंति आहे.

पुणें शहर, दि. ४-५-५६

वा. ग. अळतेकर,
मॅनेजिंग डायरेक्टर,

---

## Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4

will reopen for the academic year on 20th June, 1956. Students desirous of taking the Commerce Course after their S. S. C. Examination should apply immediately in the prescribed form with the admission fee of Rs. 32/-. The Prospectus giving detailed information about the courses and rules of admission to different classes can be obtained from the Office for six annas.

Under the Ordinance 0-233—A, B. A. with Economics of the Poona University can be admitted to one year's B. Com. degree course with the benefit of exemptions in certain subjects.

Under the new Ordinance of the Poona University a Commerce graduate can appear for B. A. Examination without keeping terms in an Arts College.

T. M. Joshi,
Principal.

## दुसरी पंचवार्षिक योजना

### मध्य सरकार व विभागीय राज्यें ह्यांच्यांतील खर्चाची वांटणी

एकूण विकास खर्चाच्या ४८०० कोटी रुपयांपैकी २५५९ कोटी रुपये मध्य सरकारचा खर्च असून २२४१ कोटी रुपये खर्च राज्य सरकारांचा मिळून आहे. मध्यसरकार आणि 'अ', 'ब' व 'क' विभागीय राज्यांकडून होणाऱ्या खर्चाची विषयवार विभागणी पुढें दिली आहे :—

(आंकडे कोटी रुपयांचे)

| | मध्य | अ विभागीय राज्यें | ब विभागीय राज्यें | क विभागीय राज्यें | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. शेती व समाजविकास | ६५ | ३५९ | ११२ | ३१ | ५६८ |
| २. पाटबंधारे व वीज | १०५ | ५६७ | २१७ | २४ | ९१३ |
| ३. उद्योग व खाणी | ७४७ | ९९ | ३७ | ७ | ८९० |
| ४. वहातुक व दळणवळण | १२०३ | १२० | ४१ | २१ | १३८५ |
| ५. समाज सेवाकार्यें | ३९६ | ३९३ | ११७ | ३९ | ९४५ |
| ६. इतर | ४३ | ४२ | ११ | ३ | ९९ |
| एकूण | २५५९ | १५८० | ५२५ | १३५ | ४८०० |

### भांडवली गुंतवणूक

सरकारी क्षेत्रांतील एकूण ४८०० कोटी रुपये खर्चापैकी सुमारें ३८०० कोटी रुपये भांडवल गुंतवणूक दर्शवितात तर १००० कोटी रुपये सामान्यतः ज्याला चालू विकास खर्च म्हणतां येईल तो दर्शवितात. प्रमुख कार्यावरील या दोन प्रकारच्या खर्चाची स्थूलमानानें विभागणी दर्शविणारा तक्ता पुढें दिला आहे :—

(आंकडे कोटी रुपयांचे)

| १ | भांडवली गुंतविण्याची रक्कम<br>२ | चालू खर्च<br>३ | एकूण खर्च<br>४ |
|---|---|---|---|
| १. शेती व समाजविकास योजना | ३३८ | २३० | ५६८ |
| (अ) शेतकी | १८१ | १६० | ३४१ |
| (आ) राष्ट्रीय शेती–विस्तार व समाजविस्तार | १५७ | ७० | २२७ |
| २. वीज व पाटबंधारे | ८६३ | ५० | ९१३ |
| (अ) पाटबंधारे व पूरनियंत्रण | ४५६ | ३० | ४८६ |
| (आ) वीज | ४०७ | २० | ४२७ |
| ३. उद्योग व खाणी | ७९० | १०० | ८९० |
| (अ) मोठें व मध्यम उद्योग आणि खाणी | ६७० | २० | ६९० |
| (आ) छोटे ग्रामोद्योग | १२० | ८० | २०० |
| ४. वाहतूक व दळणवळण | १३३५ | ५० | १३८५ |
| ५. सामाजिक स्वरूपाचीं कामें | ४५५ | ४९० | ९४५ |
| ६. इतर | १९ | ८० | ९९ |
| एकूण | ३८०० | १००० | ४८०० |

सरकारी क्षेत्रांतील ३८०० कोटी रुपये भांडवल गुंतवणुकीच्या कार्यक्रमासंबंधींचें मत खाजगी क्षेत्रांतील भांडवल गुंतवणुकीचा कार्यक्रम लक्षांत घेऊनच बनविलें पाहिजे. या दोन्ही क्षेत्रांतील एकूण गुंतवणुकीवरूनच उत्पादन व विकासाचीं लक्ष्यें ठरविलीं आहेत. गेल्या पांच वर्षांतील गुंतवणुकीच्या प्रवृत्ती लक्षांत घेऊन केलेल्या ढोबळ हिशेबावरून आणि कांहीं क्षेत्रांतील माहीत असलेलें भांडवल गुंतवणुकीचे कार्यक्रम लक्षांत घेतां दुसऱ्या योजनाकाळांत खाजगी क्षेत्रांत अंदाजें २४०० कोटी रुपये भांडवल गुंतवणूक व्हावी असा अंदाज असून त्याची विभागणी पुढील-प्रमाणें होईल:—

(आंकडे कोटी रुपयांचे)

| | |
|---|---|
| १. संघटित उद्योग व खाणी | ५७५ |
| २. मळे, वीज, धंदे आणि रेल्वेशिवाय इतर वाहतूक | १२५ |
| ३. बांधकाम | १००० |
| ४. शेती व छोटे धंदे आणि ग्रामोद्योग | ३०० |
| ५. स्टॉक्स (रोखे) | ४०० |
| एकूण | २४०० |

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत एकूण भांडवली गुंतवणूक अंदाजे ३१०० कोटी रुपयांचें आसपास झाली असावी व त्यापैकी खाजगी क्षेत्रांतील गुंतवणूक निम्म्यापेक्षा थोडी अधिक असावी. दुसऱ्या योजनेंतील भांडवल गुंतवणुकीचें लक्ष्य ६२०० कोटी रुपये असून त्यांतील सरकारी क्षेत्राचा वांटा पुष्कळच वाढला आहे. सरकारी व खाजगी क्षेत्रांतील गुंतवणुकीचें प्रमाण पहिल्या योजनेंत ५० : ५० होतें तें आतां अनुक्रमें ६१ : ३९ असें होईल.


## NOTICE

### Bank of Poona Limited

NOTICE is hereby given that the Tenth Annual Ordinary General Meeting of the Shareholders of the Bank of Poona Limited will be held at the Registered Office of the Bank, 455 Raviwar Peth, Poona City, on Monday, the 18th June 1956 at 11-30 a.m. (Standard Time) to receive the Report of Directors and the Audited Accounts for the year ended 31st December 1955, to elect a Director in place of one retiring by rotation and to appoint Auditors and fix their remuneration.

A Notice has been received from a shareholder proposing the name of M/s G. M. Oka & Co. in place of retiring auditors.

By Order of the Board,

Poona City, 17-4-56

G. G. SATHE, *Manager.*

*N. B.* The Transfer Books of The Bank will be closed from 11th June to 25 June 1956, both days inclusive.

Please note that a member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote, instead of himself and a proxy need not be a member of the Bank.

**हिंदी शेतकऱ्यांना आमंत्रण**—भारतामधील शेतीविषयक संघटनांच्या ४ प्रतिनिधींना रशिअन सरकारनें आपल्या देशाचा दौरा करण्यासाठीं आमंत्रण दिलें आहे. दौरा तीन आठवड्यांचा आंखण्यांत आला आहे. प्रतिनिधींत पार्लमेंटचे दोन सभासद आहेत. बाकीचे दोघे शेतकरी असून त्यांपैकी एक श्री. हरिश्चंद्र पाटील मुंबई राज्यांतील आहेत. दुसरे शेतकरी राजस्थानमधील आहेत.

**परकीय शास्त्रज्ञांचीं व्याख्यानें**—१९५७ सालीं कलकत्ता येथें अखिल भारतीय शास्त्रीय परिषदेचें अधिवेशन भरणार आहे. त्यावेळीं निरनिराळ्या देशांतील बरेच शास्त्रज्ञ भारतांत येणार आहेत. त्यांच्यापैकीं कांहीं जणांनीं भारतामधील विद्यापीठांपुढें आणि शास्त्रीय संशोधन संस्थांपुढें व्याख्यानें द्यावीं अशी व्यवस्था सरकारतर्फे करण्यांत येणार आहे.

**परदेशापासून गव्हाची खरेदी**—भारतीय सरकारनें १९५६ च्या ऑक्टोबरअखेर पुऱ्या होणाऱ्या सहामाहीसाठीं ऑस्ट्रेलिआकडून व अमेरिकेकडून मिळून ७ लाख टन गहूं खरेदी केला आहे. १९५६ च्या नोव्हेंबरपासून १९५७ च्या मे महिन्यापर्यंत अमेरिकेकडून आणखी १० लाख टन गहूं खरेदी करण्याचा सरकारचा विचार. गव्हाचे भाव वाढू लागल्यास हा गहूं बाजारांत पाठवून भावावर नियंत्रण ठेवण्यासाठीं ही व्यवस्था आहे.

**नीरा टिकविण्याची नवी पद्धत**—मद्रास विद्यापीठांत काम करणारे डॉ. पी. एस्. शर्मा ह्यांनीं नीरा टिकविण्याची नवीन क्रिया शोधून काढली आहे. नव्या पद्धतीमुळें ताजी नीरा ५४ तासपर्यंत न आंबतां टिकेल असें त्यांचें म्हणणें आहे. आपल्या पद्धतीची चांचणी करण्यांत यावी म्हणून डॉ. शर्मा ह्यांनीं मद्रास सरकारला विनंती केली आहे. सध्यां चुन्याची निवळी वापरून नीरा तीन तासपर्यंत टिकवितां येते.

**१,४०० कामगारांना नोटिसा**—ब्रिटनमधील स्टँडर्ड मोटार कंपनीनें आपल्या कारखान्यांत स्वयंचलित यांत्रिक उत्पादन-पद्धति चालू केली आहे. त्यामुळें १,४०० कामगार अनावश्यक झाले व त्यांना १ आठवड्याच्या पूर्वसूचनेनें कामावरून काढून टाकण्यांत आलें. त्याशिवाय ट्रॅक्टर्स तयार करण्याच्या खात्यांतील १,२०० कामगारांनाहि लवकरच नोटिसा देण्यांत येणार आहेत.

**खाणींतील मिठाचें उत्पादन**—हिमाचल प्रदेशांत मंडी-जवळ खनिज मिठाच्या खाणी आहेत. ह्या खाणींतून सध्या दरसाल १,२०,००० मण मीठ बाहेर काढलें जातें. भारतीय सरकारच्या उत्पादन खात्यानें मिठाचें उत्पादन दरसाल ३,००,००० मण करण्याची योजना आंखली आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठीं ८ लाख रुपये खर्च येईल. खनिज मिठाच्या भारतामधील ह्या एवढ्याच खाणी आहेत.

***The Brihan Maharashtra Sugar Syndicate Limited***

*980, Sadashiv Peth, Poona 2.*

## NOTICE

The Twenty-first Annual General Meeting of the Share-holders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate Limited, Poona 2, will be held on Saturday the 30th June 1956, at 4 P. M. at the Tilak Smarak Mandir, Tilak Road, Poona 2, to transact the following business—

1. To receive and adopt the Directors' Report and audited statements of accounts for the year ended 30th September 1955.
2. To sanction the payment of Dividend for the above-mentioned period.
3. To elect Directors in place of those who retire, by rotation and are eligible for re-election.
4. To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

Further the following Resolution will be moved as a Special Resolution :—

5. SPECIAL RESOLUTION

" Resolved that the Company in General Meeting hereby gives its consent and approval for the appointment of any Director of the Company for any extra or special work of the Company to be carried out on behalf of the Board of Directors of this Company or for any special services to be rendered by the Director, as may be desired by the Board of Directors and to pay for such work or services to be rendered by way of daily allowance, monthly remuneration or lump sum together with Travelling and other out of pocket expenses as may be agreed by the Board of Directors previously before such appointment, although it may amount to office of profit."

By order of the Board of Directors,

Poona 2,
25th May, 1956.

**C. G. Agashe, & Co.**
Managing Agents.

*Note* :—A member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy or proxies to attend and vote instead of himself and that a proxy need not be a member.

*Note* :—(1) The Transfer Books of the Company will be closed from 11th June 1956 to 10th July 1956 ( both days inclusive ).

(2) The Dividand when declared will be made payable at the Bank of Maharashtra Ltd., Poona 2, on and after the 25th September 1956.

EXPLANATORY STATEMENT

Under Section 314( 3 ) (a) of the New Companies Act, 1956, every payment to Directors for other services rendered by any Director besides his Directorship, on his duly being appointed by the Board of Directors becomes payment as profits under office of profits and requires sanction of the General Meeting by a Special Resolution.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.